(सोबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१११११/(प्र.क्र.९/१५)/समन्वय, दि. २८.०१.२०१५ ची प्रत.)

क्रमांक : २/एनजीसी/२०१५/संकीर्ण-३/२०८
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१
दिनांक : 9 FEB 2015

---

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अनुदानित व विना-अनुदानित पदवी/पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून त्याबाबत अंमलबजावणी करण्याच्या सुचना तात्काळ द्याव्यात. ज्या संस्था परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यास कसुर करतील त्या संस्थांविरुध्द योग्य कारवाई करण्यात येईल असेही सुचित करण्यात यावे.

२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १६, १० व २अ मुख्य कार्यालय, मुंबई.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

क्रमांक:-विकाअ/शिक्षण/लोकसेवा आ./२०१५/४०८
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक १९/२/२०१५.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित, पदविका / पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था यांना कळविण्यात येते की, सोबतच्या परिपत्रकानुसार योग्य कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित
परीक्षांकरिता शाळा/महाविद्यालये उपलब्ध
करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-१११९/(प्र.क्र.९/१५)/समन्वय**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २८ जानेवारी, २०१५.

वाचा :-

१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.मलोआ-१०१२/ प्र.क्र.९५/१२/आठ, दि.११.५.२०१२.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र (१) क्र.८६(१)/२०१२/तीन, दि.९.७.२०१४ व (२) क्र.८६(१)/२०१५/तीन, दि.३.१२.२०१४.

**शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासनाच्या संबंधीत विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी परिक्षांचे आयोजन केले जाते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली जाते व बहुतांशी शाळा/ महाविद्यालयांकडून नकार दिला जातो. परिणामी शाळा/ महाविद्यालयाच्या असहकाराचा विपरित परिणाम आयोगाच्या परीक्षा आयोजनावर होत असतो. ही बाब विचारात घेऊन आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन द्यावीत अन्यथा त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल असे निदेश/सूचना संबंधितांना संचालक, शिक्षण/तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण यांच्यामार्फत कृपया द्याव्यात, अशा सूचना संदर्भाधिन शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन द्यावीत अन्यथा त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल असे निदेश /सूचना संचालक, तंत्र शिक्षण /उच्च शिक्षण /व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी सर्व संबंधितांना द्यावेत. तसेच संचालक, तंत्र शिक्षण /उच्च शिक्षण/ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन न देणा-या संस्थांविरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

पत्र प्राप्त झाले
31 JAN 2015
आवक लिपिक

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५०१२८१७२३१४६२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamini R Pilankar

Digitally signed by Kamini R Pilankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=791d70f75a6bfaa8349786f02d71cad4fb9d1999ea0d92d63dcf5de198d4f817, cn=Kamini R Pilankar
Date: 2015.01.28 17:32:29 +05'30'

(का.रा.पिळणकर)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई- ४०० ०२१.
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४. संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. संचालक, प्रशिक्षण , व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सामान्य प्रशासन विभाग ( का-८ ), मंत्रालय, मुंबई.
७. सर्व सह सचिव /उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवडनस्ती (समन्वय).